# शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल

# "माजी पंतप्रधान इंदिरा गांधी जयंती"

## अहवाल

---

दिनांक: १९ नोव्हेंबर २०२५

स्थळ: शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल

शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल येथे दिनांक १९ नोव्हेंबर २०२५ रोजी भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान व आयर्न लेडी ऑफ इंडिया म्हणून ख्याती असलेल्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त "इंदिरा गांधी जयंती" कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. तसेच या दिवशी "झाशीची राणी लक्ष्मीबाई" यांचीही जयंती साजरी करण्यात आली. हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या प्राध्यापिका मा. डॉ. बिजली दडपे मॅडम आणि मा. डॉ. नीलिमा मोरे मॅडम यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या मा.डॉ. रमा भोसले मॅडम  होत्या. सर्व प्राध्यापक वृंद तसेच प्रथम वर्षीय छात्राध्यापकांच्या उपस्थितीने हा कार्यक्रम अतिशय सुंदर आणि यशस्वीरित्या संपन्न झाला.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन,सरस्वती पूजन व "इंदिरा गांधी" यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. त्यानंतर प्रास्ताविक महाविद्यालयाच्या प्रथम वर्षीय छात्राध्यापिका तेजल भोईर यांनी केले तसेच कार्यक्रमाचा मुख्य विषय इंदिरा गांधींचे जीवनकार्य ,नेतृत्व ,धैर्य आणि आधुनिक भारताच्या

जडणघडणीतला त्यांचा सहभाग या मुद्द्यांवर त्यांनी प्रकाश टाकला.

त्यानंतर नेहमीप्रमाणे परिपाठ घेण्यात आला. सुरुवातीला प्रथम वर्षीय बी.एड. छात्राध्यापक जयेश नडगे यांनी पंचांग, दिनविशेष वाचन करून आजच्या दिवसाचे महत्त्व सांगितले. तसेच त्यांनी "इंदिरा गांधी" यांच्या जीवन परिचयाबद्दल थोडक्यात माहिती मांडली.

यानंतर प्रथम वर्षीय छात्राध्यापिका प्रतिभा चाबके यांनी आजच्या बातम्या सादर केल्या. पुढे प्रथम वर्षीय छात्राध्यापिका शिवानी चौरागडे यांनी इंदिरा गांधी यांच्या जीवनावर आधारित सामान्य ज्ञान प्रश्नोत्तरे सत्र घेतले. शेवटी प्रथम वर्षीय छात्राध्यापिका स्वाती म्हैसमाळे यांनी इंदिरा गांधी यांच्या जीवनातून प्रेरणा देणारी एक सुंदर बोधकथा सांगून सर्वांना विचार प्रवृत्त केले.

कार्यक्रमाच्या शेवटच्या टप्प्यात उपस्थित सर्वांनी "नशामुक्त भारत प्रतिज्ञा" उत्स्फूर्तपणे घेतली. समाजातील वाढत्या व्यसनाधीनतेला आळा घालण्यासाठी व युवकांमध्ये जनजागृती निर्माण करण्यासाठी ही प्रतिज्ञा अत्यंत महत्त्वपूर्ण ठरली. या प्रतिज्ञेमुळे विद्यार्थ्यांमध्ये निरोगी, सकारात्मक आणि सुसंस्कृत जीवनशैली अंगीकारण्याचा संकल्प दृढ झाला. यानंतर एकात्मभाव, बंधुता आणि मानवतेचा संदेश देणारी उद्देशिका, त्यानंतर प्रार्थना, राज्यगीत घेण्यात आले. यानंतर कार्यक्रमाचा औपचारिक समारोप राष्ट्रगीताने करण्यात आला.

कार्यक्रमाचे सुयोग्य आणि प्रभावी सूत्रसंचालन बी.एड. प्रथम वर्षीय छात्राध्यापिका तेजल भोईर यांनी केले. संपूर्ण कार्यक्रमात सर्व प्राध्यापक वृंद आणि बी.एड. प्रथम वर्षीय विद्यार्थी यांचा सक्रिय सहभाग होता. हा कार्यक्रम अतिशय सुंदर आणि यशस्वीरित्या संपन्न झाला.



शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल.

( बी. एड्. प्रथम वर्ष २०२५-२७ )

इंदिरा गांधी जयंती

## निमंत्रण पत्रिका

आपणास कळविण्यात आनंद होत आहे की, दिनांक - 19 नोव्हेंबर, २०२५ रोजी शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल येथे इंदिरा गांधी ह्यांच्या जयंतीनिमित्त या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

**आयोजक**

मा. प्रा. बिजली ढडपे

मा. प्रा. डॉ. नीलिमा मोरे

**अध्यक्ष**

मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले

**प्रमुख उपस्थिती**

मा. प्रा. डॉ. प्रियांका सुभेदार मा. प्रा. डॉ. उज्वला डोणे

स्थळ : सरस्वती कक्ष वेळ : सकाळी ११:00 वाजता



शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल.

( बी. एड्. प्रथम वर्ष २०२५-२७)

इंदिरा गांधी जयंती.

## कार्यक्रम पत्रिका

(दिनांक : १९ नोव्हेंबर २०२५)

**परिपाठ**

| | |
|---|---|
| सरस्वती पूजन आणि द्वीप प्रज्वलन | मा. प्राचार्य व सर्व प्राध्यापक वृंद |
| सूत्रसंचालक | तेजल भोईर |
| पंचांग आणि दिनविशेष | पंचांग आणि दिनविशेष व इंदिरा गांधी यांच्या विषयी थोडक्यात माहिती, जयेश नडगे |
| बातम्या | प्रतिभा चाबके |
| सामान्य ज्ञानाचे प्रश्न | इंदिरा गांधी याच्या जीवनावर आधारित प्रश्न, शिवानी चौरागडे |
| बोधकथा | इंदिरा गांधी यांच्या जीवनावर आधारित बोधकथा, स्वाती म्हैसमाळे |
| फोटोग्राफी, व्हिडिओ | पंकज देवकर, नितीन कवाड |

स्थळ : सरस्वती कक्ष वेळ : सकाळी ११:०० वाजता







**मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले मॅडम दीपप्रज्वलन, सरस्वती पूजन आणि प्रतिमा पूजन करताना.**







बी.एड. प्रथम वर्षीय छात्राध्यापक परिपाठ घेताना.







बी.एड. प्रथम वर्षीय छात्राध्यापक जयेश नडगे पंचांग, दिनविशेष आणि "माजी पंतप्रधान इंदिरा गांधी" यांच्या जीवन परिचयाबद्दल माहिती सांगताना.







बी.एड. प्रथम वर्षीय छात्राध्यापिका तेजल भोईर कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन करताना.




प्रथम वर्षीय छात्राध्यापिका स्वाती म्हैसमाळे "माजी पंतप्रधान इंदिरा गांधी" यांच्या जीवनातील प्रेरणा देणारी बोधकथा सांगताना.




बी.एड. प्रथम वर्षीय छात्राध्यापक नितीन कवाड आणि पंकज देवकर यांनी "माजी पंतप्रधान इंदिरा गांधी जयंती" निमित्त केलेले फलक लेखन.